# देशी खेळातून भाषिक व शारीरिक विकास




**• नवोपक्रम सादर कर्ता •**

**श्री. अरुण लक्ष्मीनारायण धकाते**

सहायक शिक्षक

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, धरमवाडी

पंचायत समिती माहूर जिल्हा नांदेड


२०२३-२०२४

# • सर्वसाधारण माहिती

| | |
|---|---|
| स्पर्धकाचे नाव - | श्री.अरुण लक्ष्मीनारायण धकाते |
| पद - | सहायक शिक्षक |
| शाळा - | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, धरमवाडी |
| | पंचायत समिती - माहूर  जिल्हा परिषद - नांदेड  पिन -४३१७२१ |
| शैक्षणिक पात्रता- | बी.ए., बी.एस्सी., |
| | एम. ए. (इतिहास, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, मराठी, तत्वज्ञान, हिंदी) |
| व्यावसायिक पात्रता - | बी.जे., बी.लिब., बी.एड., एम.लिब.,एम.एड., एम.फिल., |
| | पीएच.डी. (शिक्षणशास्त्र ) |
| सेवा रुजू दिनांक - | ०२ \११\२००१ |
| शाळा रुजू दिनांक - | १०\०९\२०२० |
| संपर्क पत्ता- | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, धरमवाडी |
| | पंचायत समिती - माहूर  जिल्हा परिषद - नांदेड  पिन -४३१७२१ |
| संपर्क क्रमांक - | ९४०५५२४१८४ , ७२६२०७४०५० |
| ई-मेल - | arundhakate४३२@gmail.com |
| नवोपक्रमाचे शीर्षक - | देशी खेळातून भाषिक व शारीरिक विकास |
| नवोपक्रम आयोजन सत्र - | २०२३-२०२४ |

# • अनुक्रमणिका


| अ.क्र. | विवरण | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | नवोपक्रमाचे शीर्षक | ०१ |
| २ | प्रस्तावना | ०१ |
| ३ | नवोपक्रमाची गरज व महत्त्व | ०२ |
| ४ | नवोपक्रमाची उद्दिष्टे | ०३ |
| ५ | नवोपक्रमाचे नियोजन | ०३ |
| ६ | नवोपक्रमाची कार्यपद्धती | ०५ |
| ७ | नवोपक्रमाची यशस्विता | २० |
| ८ | समारोप | २१ |
| ९ | संदर्भसूची | २२ |
| १० | परिशिष्टे | २३ |

## • नवोपक्रमाचे शीर्षक - देशी खेळातून भाषिक व शारीरिक विकास

## • प्रस्तावना

"विद्या विहीन: पशूभि समान:" या संस्कृत श्लोकानुसार मानवी जीवनात शिक्षणाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. बुद्धी किंवा विचारशक्ती केवळ मानवी प्राण्यातच आहे असे नाही. परंतु मानवेतर प्राणी त्यांचा उपयोग केवळ स्वसंरक्षणासाठी व भक्ष्य शोधार्थ करतात. मानवाच्या विकासासाठी विद्या महत्वपूर्ण साधन ठरलेले आहे. म्हणून कृष्णशास्त्री चिपळूणकर म्हणतात, "विद्येनेच मनुष्या आले श्रेष्ठत्व या जगामाजी". शिक्षणाचा संकुचित अर्थ म्हणजे साक्षरता परंतु शिक्षण ही व्यापक संकल्पना आहे. शिक्षणाची व्याख्या करताना, "संपूर्ण जीवनाची तयारी म्हणजे शिक्षण" असे हरबार्ट स्पेन्सर म्हणतात तर भारतीय शिक्षण विचारवंत स्वामी विवेकानंद "मानवातील उपजत दैवी गुणांची अभिव्यक्ती म्हणजे शिक्षण होय." असे म्हणतात. महात्मा गांधींनी "मानवाच्या शारीरिक, मानसिक व आध्यात्मिक अंगामधील उत्कृष्टतेचा विकास व अभिव्यक्ती म्हणजे शिक्षण होय." असे म्हटलेले आहे. तज्ञांच्या व्याख्यांचा परामर्श घेतल्यानंतर एवढे म्हणता येईल की, मानवाच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण महत्त्वाचे आहे.

शिक्षणामुळे माणसाचा बौद्धिक, भावनिक, सामाजिक, शारीरिक व अध्यात्मिक विकास होतो. माणसाच्या सद्गुणावर व सदाचारणावर भर दिलेल्या गुणांच्या विकासाची संधी उपलब्ध होऊन स्वावलंबी बनण्याचे पूर्ण कार्य शिक्षणातून होते. शिक्षणाचे औपचारिक व अनौपचारिक प्रकार आहेत. भारतासारख्या विकसनशील देशात व्यक्तीच्या विकासासाठी औपचारिक शिक्षणाची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. भारतात ६ ते १४ वर्षे वयोगटाला अनिवार्य व मोफत शिक्षणाची सोय 'बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार २००९' अंतर्गत केलेली आहे. इयत्ता पहिली ते चौथीचे प्राथमिक शिक्षण हा सर्व शिक्षणाच्या पाया समजला जातो. या वर्गातील मुलांना ज्या गोष्टी माहिती झाल्या किंवा शिकवल्या गेल्या त्या संपूर्ण जीवनात लक्षात राहतात. यादृष्टीकोणातून प्राथमिक शिक्षण हा व्यक्तीच्या विकासाचा संपूर्ण आधारस्तंभ मानला जातो. याकरिता इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांचा शारीरिक, मानसिक, भावनिक, बौद्धिक व सामाजिक विकासासाठी विविध उपक्रमाचे आयोजन करणे महत्त्वपूर्ण बाब ठरते.

'भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवा'निमित्त देशभरात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले होते. त्या कार्यक्रमाचे शाळेत नियोजन करीत असताना विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने त्या कार्यक्रमाची सांगड घालता येईल का ? याबाबत विचार करण्यात आला. त्यामध्ये 'मेरी माटी, मेरा देश' या उपक्रमाचा विशेष उपयोग करण्यात आला. 'शरीर माद्य खलु धर्म साधनमं' या उक्तीनुसार निरोगी शरीरात निरोगी मन वास करते. विद्यार्थ्यांचे शरीर जर बलशाली असेल तर त्याचे मन निरोगी राहील या दृष्टीने विद्यार्थ्यांचे निरोगी शरीर तयार करण्याचा सर्वप्रथम विचार करण्यात आला. त्यासाठी 'मेरी माटी, मेरा देश' या उपक्रमात विविध देशी खेळांची विद्यार्थ्यांना माहिती करून देऊन त्यामध्ये त्यांना सहभागासाठी प्रेरित करण्यात आले. विविध देशी

खेळांतून भाषिक व बौद्धिक खेळ व स्पर्धेद्वारे भाषिक व शारीरिक विकासासाठी या नवोपक्रमाची संकल्पना साकारली.

## • नवोपक्रमाची गरज व महत्त्व :-

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज 'ग्रामगीते'च्या १९व्या अध्यायात लिहितात-

**"ऐसे जीवन आणि शिक्षण | यांचे साधावे गठबंधन |**
**प्रथमपासूनचि सर्वांगीण | शिक्षण द्यावे तारतम्ये || ६५ ||"**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या या ओवीतून आपणास असे लक्षात येते की, सुरुवातीपासूनच विद्यार्थ्यांना सर्वांगीण विकासाच्या संदर्भात मिळालेले शिक्षण हे कधीही त्याच्या जीवनात कामी येऊन त्याच्या जीवनातील सर्व बाबींचे योग्य पद्धतीने गठबंधन होऊन तो आपला विकास करू शकतो. यासाठी प्राथमिक शिक्षण हा पाया मानला जातो. आजच्या आधुनिक काळात भौतिक आकर्षकतेत वाढ झालेली आहे. विज्ञान व तंत्रज्ञानामुळे आपण अनेक शोध लावून मानवी जीवन सुलभ केलेले आहे. टी.व्ही., टेलिफोन, काम्पुटर व मोबाईल सारख्या अनेक शोधामुळे शिक्षण प्रक्रियेतसुद्धा आमुलाग्र बदल झालेला दिसून येत आहे. आधुनिकीकरणामुळे भौतिक संस्कृतीचा विकास होताना मुळ संस्कृतीशी दुरावा झाल्याचे मान्य करावे लागेल. आधुनिक काळात या नवनवीन साधनाचे दुष्परिणाम सुद्धा अनेक संशोधनातून मांडण्यात आलेले आहे. जगात अनेक देश नवीन तंत्रज्ञानाचा व साधनांचा वापर करतांना स्वत:च्या मुळ देशी संस्कृती, परंपरा, खेळ इत्यादी बाबींना जोपासण्याचा प्रयत्न करताना दिसून येते. भारतासारख्या देशात या बाबीची गरज नाही का ? या प्रश्नाचे उत्तर होय आहे. टी.व्ही.मुळे जग जवळ आले व शेकडो मैलावरील माहिती घरी बसल्या मिळू लागली. मनोरंजनाचे साधन म्हणून टी.व्ही.चा वापर झाला खरा मात्र विद्यार्थी मैदानी खेळापासून दूर होत गेले ही वास्तविकता नाकारता येत नाही. आता तर मोबाईलमुळे ही दुरी किती तरी पटीने वाढलेली आहे. विद्यार्थी सतत मोबाईलवर दिसून येतात. ऑनलाईन शिक्षणाच्या गोंडस नावाखाली आज मुलांना डोळे, कान, मान, पाठ यांच्या शारीरिक आजारासह हिंसक वृत्ती, चिडचिडेपणा, एकाकीपणा यासारख्या भावनिक व मेंदूचा मानसिक आजारांची भेटवस्तू मोबाईलच्या माध्यमातून देत आहोत. मग विद्यार्थ्यांचे शरीर, मन व बुद्धी कशी विकसित होणार ? आपणास उत्तम पिढी कशी मिळणार ? अशीच प्रक्रिया सुरु राहिल्यास उज्ज्वल भारत कसे घडणार ? याबाबीवर विचार होणे गरजेचे ठरते.

उत्तम शारीरिक विकासातून उत्तम व निरोगी मन विकसित पावते. अगोदरच्या पिढीचा विचार केल्यास मातीशी जुळलेले नाते, खेळाप्रती आवड यासोबत आरोग्यदायी सवयीमुळे आयुष्य निरोगी जगत होते. आज शारीरिक खेळाकडे दुर्लक्ष करीत असल्याचा परिणाम लहानपणीच डोळ्यांचे आजार, आंतरिक शक्ती विकसित न होणे व परिणामी अभ्यासात अपेक्षित प्रगती प्राप्त न होणे दिसून येत आहे. शारीरिक व बौद्धिक विकासासाठी देशी खेळ कसे फायदेशीर ठरतात याबाबत विचार करणे अत्यंत आवश्यक आहे. भारतातील देशी खेळाना प्राचीन वारसा लाभलेला आहे. भारतीय देशी

खेळ भारतीय भौगोलिक वातावरणानुसार आहेत. भारतातील देशी खेळांना सामाजिक व सांस्कृतिक बैठक आहे. भारतातील देशी खेळ सामाजिक एकता निर्माण करतात. भारतातील देशी खेळ मनोरंजन व आनंद देतात. भारतीय देशी खेळातून सहजपणे शारीरिक विकास साधता येतो. यासोबत भाषिक व बौद्धिक विकास सुद्धा सहज साधता येतो. आधुनिकीकरण व मोबाईलच्या युगात आज भारतासारख्या खेड्यांच्या देशातही देशी खेळाची संस्कृती लोप पावते आहे. या संस्कृतीचे संवर्धन व संरक्षण करणे ही काळाची गरज आहे. खेळातून आनंद प्राप्ती, सहज शिक्षण त्यातून भाषिक व शारीरिक विकास करण्यासाठी सदर नवोपक्रमाची आवश्यकता वाटली.

त्याकरिता जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, धरमवाडी शाळेतील इयत्ता पहिली ते चौथीच्या सर्व विद्यार्थ्यांसाठी **'देशी खेळातून भाषिक व शारीरिक विकास'** या नवोपक्रमाचे आयोजन करण्याचे ठरविण्यात आले.

## • नवोपक्रमाची उद्दिष्टे :-

सदर नवोपक्रमाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे-

१) विद्यार्थ्यांना भारतीय देशी खेळाबद्दल माहिती देणे.

२) विद्यार्थ्यांना कृतीयुक्त व आनंददायी शिक्षण देणे.

३) विद्यार्थ्यांचा भाषिक व शारीरिक विकासासाठी 'स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव', 'मेरी माटी, मेरा देश' यासारखे उपक्रमांचे आयोजन करणे.

४) भारतीय देशी खेळातून विद्यार्थ्यांचा भाषिक विकास साधणे.

## • नवोपक्रमाचे नियोजन :-

नवोपक्रमाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी नवोपक्रमाचे नियोजन करण्यात आले. नियोजनानुसार नवोपक्रमाची पूर्वतयारी महत्वाची ठरली. सदर नवोपक्रमासाठी विद्यार्थी निवड, कालावधी, आयोजित करावयाचे विविध उपक्रम, सराव, अनुधावन कार्य यासर्वांचा काळजीपूर्वक विचार करण्यात आला. **नवोपक्रमाचा स्थूल आराखडा** पुढीलप्रमाणे तयार करण्यात आला.

| अ.क्र. | शीर्षक | विवरण |
|---|---|---|
| १ | नवोपक्रमासाठी समाविष्ट इयत्ता | १ ते ४ |
| २ | नवोपक्रमासाठी समाविष्ट विद्यार्थी | सर्व ६७ विद्यार्थी |
| ३ | नवोपक्रमाचा कालावधी | १ जुलै २०२३ ते ३१ ऑक्टोंबर २०२३ |
| ४ | नवोपक्रमासाठी विद्यार्थ्यांचे गट तयार करणे. | जुलै २०२३ |
| ५ | देशी खेळांची यादी तयार करणे. नवोपक्रमासाठी खेळांची निवड करणे. भाषिक खेळांची यादी तयार करणे. नवोपक्रमासाठी भाषिक खेळांची निवड करणे. | जुलै २०२३ |
| ६ | देशी खेळांची प्राथमिक माहिती देणे. | जुलै २०२३ |
| ७ | देशी खेळांचे महत्व समजावून देणे. | जुलै २०२३ |
| ८ | नवोपक्रमासाठी निवडलेल्या बैठे देशी खेळांचे प्रात्यक्षिक व सराव घेणे. | जुलै २०२३ ते ऑक्टोंबर २०२३ |
| ९ | नवोपक्रमासाठी निवडलेल्या मैदानी देशी खेळांचे प्रात्यक्षिक व सराव घेणे. | जुलै २०२३ ते ऑक्टोंबर २०२३ |
| १० | नवोपक्रमासाठी निवडलेल्या बैठे व मैदानी देशी खेळांतून भाषिक विकासासाठी उपक्रम आयोजन करणे व सराव घेणे . | जुलै २०२३ ते ऑक्टोंबर २०२३ |
| ११ | नवोपक्रमासाठी निवडलेल्या विविध भाषिक व शारीरिक खेळांच्या स्पर्धा आयोजन करणे. | जुलै २०२३ ते ऑक्टोंबर २०२३ |

नवोपक्रमासाठी १ जुलै २०२३ पासून सुरुवात करण्याबाबत नियोजन करण्यात आले. शासनाकडून शाळेला भाषा व गणित साहित्य पेटी प्राप्त झालेल्या आहेत. त्या साहित्य पेटीचा वापर सदर नवोपक्रमासाठी करण्याचे नियोजन करण्यात आले. इयत्ता १ ते ४ चे सामुहिक परिपाठाचे नियोजन करण्यात आले. परिपाठात सादर करावयाच्या बाबीबद्दल सर्व विद्यार्थ्यांना माहिती देणे, परिपाठात सुविचार, प्रार्थना, सामान्य ज्ञान, भाषिक खेळ, गंमती-जंमती, कविता, गाणी, इंग्रजी शब्द , वाक्प्रचार-म्हणी, देशी खेळांची नावे, खेळ व खेळांडूचा परिचय, खेळांचे महत्त्व यासारख्या

कोणत्या बाबी समाविष्ट करता येतील याविषयी शाळेतील शिक्षक व विद्यार्थ्यासोबत चर्चा नियोजन करण्यात आले. त्या चर्चेअंती उपक्रमासाठी दररोजचा नियोजित कालावधी किती ? दर आठवड्यात एक खेळ प्रात्यक्षिकासह समजावून देणे, प्रत्येक गटाचा सराव घेणे, प्रत्येक विद्यार्थ्याला पुरेशी संधी मिळेल का ? याबाबत दक्षता, आठवड्यात घेण्यात येणाऱ्या परिपाठातील बाबी व दैनंदिन अभ्यासक्रमाधारित दर शनिवारला प्रश्नमंजुषा उपक्रमाबाबत चर्चा करून नवोपक्रमाचे अंतिम स्वरूप व रूपरेषा ठरविण्याचे नियोजन करण्यात आले.

## • नवोपक्रमाची कार्यपद्धती :-

नवोपक्रमासाठी १ जुलै २०२३ पासून सुरुवात करण्यात आली. भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवानिमित्त शासनातर्फे विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले होते. शासनाकडून शाळेला भाषा व गणित साहित्य पेटी प्राप्त झालेल्या आहेत. त्या साहित्य पेटीचा वापर सदर नवोपक्रमासाठी करण्यात आला. शाळेतील शिक्षक व विद्यार्थ्यांशी चर्चेअंती नवोपक्रमाचे अंतिम स्वरूप व रूपरेषा ठरविण्यात आली. त्यानुसार पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली.

सर्वप्रथम नवोपक्रमाच्या नियोजनानुसार पुढीलप्रमाणे पूर्वतयारी करण्यात आली.

**अ) गट तयार करणे** :-

इयत्ता पहिली व दुसरीचे विद्यार्थी हे इयत्ता तिसरी व चौथीच्या तुलनेत थोडे लाजरे असतात. या बाबीसाठी इयत्ता पहिली, दुसरी, तिसरी व चौथी या सर्व वर्गाचे मुले-मुली एकत्रित संमिश्र गट तयार करण्यात आले. विद्यार्थ्यांचे गट तयार करताना संभाव्यता निवड पद्धतीचा वापर करण्यात आला.

**नवोपक्रमासाठी तयार केलेले विद्यार्थ्यांचे गट-**

| गट क्रमांक | गटाचे नाव | गट प्रमुख | समाविष्ट विद्यार्थी संख्या | | | | एकूण विद्यार्थी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | इयत्ता पहिली | इयत्ता दुसरी | इयत्ता तिसरी | इयत्ता चौथी | |
| १ | सावित्रीमाई फुले | कु.संस्कृती सूर्यवंशी | ३ | ४ | २ | २ | ११ |
| २ | महात्मा फुले | रणवीर कांबळे | ३ | ४ | २ | २ | ११ |
| ३ | डॉ.बाबासाहेब आंबेडकर | उत्कर्ष दुधे | ३ | ४ | २ | २ | ११ |
| ४ | छत्रपती शिवाजी महाराज | अभय लांडगे | ३ | ३ | १ | ४ | ११ |
| ५ | महात्मा गांधी | प्रज्वल पंडित | ३ | ३ | १ | ४ | ११ |
| ६ | राजमाता जिजाऊ | कु.लावण्या वानखेडे | ३ | ३ | १ | ५ | १२ |
| एकूण | | | १८ | २१ | ९ | १९ | ६७ |

गट तयार केल्यामुळे विद्यार्थी एकमेकांसोबत चर्चा करू लागले. विद्यार्थ्यांमध्ये विचाराचे व ज्ञानाचे आदान-प्रदान होऊ लागले. विद्यार्थ्यांना नेतृत्व विकासाची संधी मिळाली. विद्यार्थी प्रगटीकरणासाठी तयार होण्यास सुलभता झाली.

**ब) देशी खेळ :-**

भारताला प्राचीन सामाजिक व सांस्कृतिक वारसा लाभलेला आहे. यासोबतच भारताला प्रादेशिक देशी खेळांचा वारसा मिळालेला आहे. आधुनिक काळात या देशी खेळांकडे दुर्लक्ष झालेले असले तरी देशी खेळांचे महत्त्व कमी झालेले नाही. विद्यार्थ्यांच्या शारीरिक विकासासाठी देशी खेळांची महत्वपूर्ण भूमिका ठरते. विद्यार्थ्यांचे शरीर बलशाली करणे, शौर्य, साहस गुणांचे विकास करण्यासाठी विशेषत: ग्रामीण भागात विविध देशी खेळांचे आयोजन करण्यात येत होते. या खेळामध्ये मल्लयुद्ध, मल्लखांब, सूर्यनमस्कार, कुस्ती, कबड्डी, खो-खो सारख्या खेळांचा समावेश असल्याचे दिसून

येते. यासोबत मुली लगोरी, लंगडी असे खेळ खेळत होते. अनेक भारतीय क्रांतिकारीच नव्हे तर समाजसुधारकसुद्धा या देशाच्या मातीतून घडलेले आहेत. या बाबींची जाणीव लक्षात ठेवून विद्यार्थ्यांना या मातीशी जोडून आपल्या मातीबद्दल प्रेम निर्माण व्हावे म्हणून देशी खेळांच्या उपक्रमाचे आयोजन करण्याचे ठरविण्यात आले.

• **काही देशी खेळांची यादी** :-

१) पत्र हरवले

२) चाक शर्यत

३) विटी दांडू

४) चतुरमेंढा

५) काडी पकड

६) लगोरी

७) डब्बा

८) चंगा- अष्टा

९) कबड्डी

१०) लंगडी

११) गोल रिंग

१२) सागरगोटी

१३) लपाछपी

१४) टिचकी मारा

१५) डंबेल्स

१६) योगा

१७) प्राणायाम

१८) मल्लखांब

१९) कुस्ती

२०) कांचे

२१) धावणे

२२) उडया मारणे

२३) दोरी उडया मारणे

२४) द्या टाळी

२५) चौरस (लुडो)

२६) साप शिडी

२७) बाजार

२८) लेझीम

२९) साखळी बंधन

३०) सूर पारंब्या

३१) सळी खुपसणे

३२) हॉकी

**क) नवोपक्रमासाठी देशी खेळांची निवड -**

स्थानिक परिस्थिती व साधनांच्या उपलब्धतेनुसार वरील खेळांपैकी खालील बैठे व मैदानी देशी खेळांची नवोपक्रमासाठी निवड करण्यात आली. नवोपक्रमामध्ये निवड केलेल्या खेळांसोबत भाषिक खेळांची सांगड घालून सदर खेळ घेण्यात आले.

१) पत्र हरवले

२) चतुरमेंढा

३) काडी पकडणे

४) डब्बा

५) द्या टाळी

६) गोल रिंग

७) सागरगोटी

८) टिचकी मारा

९) साप शिडी

१०) चौरस (लुडो)

११) चंगा- अष्टा

१२) उडया मारा

१३) दोरी उडया मारा

१४) धावणे

१५) बाजार

१६) लगोरी

१७) कबड्डी

१८) लंगडी

१९) लेझीम

२०) डंबेल्स

**ड) नवोपक्रमासाठी निवडलेले भाषिक खेळ -**

१) बडबडगीत

२) कविता गायन

३) मुळाक्षरे ओळख

४) शब्द वाचन

५) शब्द भेंडी

६) समानार्थी / विरुधार्थी शब्द

७) लिंग बदल

८) यमक जुळणारे शब्द

९) एकाच गटातील शब्द

१०) एकाच अक्षरावरील शब्द

११) वाक्प्रचार- म्हणी

१२) भाषा पेटीतील साहित्ये आधारित कृती

१३) प्रश्नमंजुषा

**ई) नवोपक्रमाची विद्यार्थ्यांना माहिती :-**

इयत्ता १ ते ४ च्या विद्यार्थ्यांचे सामुहिक परिपाठाचे नियोजन करण्यात आले होते. परिपाठात सादर करावयाच्या बाबीबद्दल सर्व विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली होती. परिपाठात सुविचार, प्रार्थना, सामान्य ज्ञान, भाषिक खेळ, गंमती-जंमती, कविता, गाणी, इंग्रजी शब्द, वाक्प्रचार-म्हणी, देशी खेळाची नवे, खेळ व खेडाळूचा परिचय, खेळाचे महत्व इत्यादी बाबी समाविष्ट करण्यात आल्या व त्याबाबत माहिती दिली. आठवड्यात घेण्यात येणाऱ्या परिपाठातील बाबी व दैनंदिन अभ्यासक्रमाधारित दर शनिवारला प्रश्नमंजुषा उपक्रमाबाबत माहिती दिली.

नवोपक्रमासाठी १ जुलै २०२३ पासून दररोज ४० मिनिटे राखीव ठेवण्याबाबत नियोजन करण्यात आले होते. त्यामध्ये दर आठवड्यात एक खेळ प्रात्यक्षिकासह समजावून देण्यात आला. प्रत्येक गटाचा पुरेसा सराव घेण्यात आला. प्रत्येक विद्यार्थ्याला पुरेशी संधी मिळेल याबाबत दक्षता घेण्यात आली. सराव पश्चात स्पर्धा तयारी करून घेण्यात आली. स्पर्धेत विजयी होणाऱ्या स्पर्धकांना बक्षिसे देण्याबाबत माहिती देण्यात आली.

**फ) खेळ व उपक्रमाची प्रत्यक्ष कार्यवाही :-**

प्रत्यक्ष खेळ व उपक्रमाचे प्रात्यक्षिक व कार्यवाही पुढीलप्रमाणे-

**१) पत्र हरवले :-**

खेळणे ही विद्यार्थ्यांची मुळ प्रवृत्ती असते. विद्यार्थ्यांना खेळातून शिक्षण दिल्यास ते आनंदाने शिक्षण घेतात. 'मामाचे पत्र हरवले' हा खेळ आपणास माहीतच आहे. या खेळाचा उपयोग विद्यार्थ्यांच्या भाषिक विकासासाठी करण्यात आला. 'मामाचे पत्र हरवले' या खेळाचा उपयोग नातेसंबंधाच्या दृढीकरणासाठी करण्यात आला. या खेळामध्ये बाकी विद्यार्थी गोलाकार बसतात. डाव देणारा विद्यार्थी हातात पत्र घेऊन गोलाकार फिरतो. गोलाकार फिरताना नातेसंबंधावर गीत गातो. ज्या विद्यार्थ्यांच्या पाठीमागे ते पत्र ठेवण्यात येईल तो विद्यार्थी त्या डाव देणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मागे धावतो. डाव देणारा विद्यार्थी नातेसंबंधावर गीत म्हणतो गोलाकार विद्यार्थी ते गीत पूर्ण करतात. पुढील प्रकारे विविध नातेसंबंधांची माहिती देण्यात आली.

| **डाव देणारा विद्यार्थी** | **गोलाकार बसलेले विद्यार्थी** |
|---|---|
| माझ्या आईचे पत्र हरवले ... | तेच आम्हाला सापडले. |
| माझ्या बाबाचे पत्र हरवले... | तेच आम्हाला सापडले. |
| माझ्या मामाचे पत्र हरवले... | तेच आम्हाला सापडले. |
| माझ्या मामीचे पत्र हरवले... | तेच आम्हाला सापडले. |
| माझ्या काकाचे पत्र हरवले... | तेच आम्हाला सापडले. |
| माझ्या काकूचे पत्र हरवले... | तेच आम्हाला सापडले. |
| माझ्या आत्याचे पत्र हरवले... | तेच आम्हाला सापडले. |



या उपक्रमामुळे -

१) विद्यार्थ्यांना धावण्याच्या सराव झाला.

२) विद्यार्थ्यांना आनंद मिळाला.

३) विद्यार्थ्यांना विविध नातेसंबंधाची माहिती झाली.

४) आपल्या मागे पत्र ठेवण्यात आलेले आहे का ? याबाबत विद्यार्थी चौकस होऊ लागले.

## २) चतुरमेंढा

**चतुरमेंढा** हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या शारीरिक व भाषिक विकासासाठी आयोजित करण्यात आला. हा खेळ दोन गटात खेळला जातो. या खेळात एका वर्तुळात पहिल्या गटातील विद्यार्थी उभे करण्यात आले. दुसऱ्या गटातील एक विद्यार्थी डाव देतो. तो डाव देताना एक गीत / कविता, वाक्प्रचार- म्हणी  म्हणतो. त्या गीताद्वारे तो आतील वर्तुळात असणाऱ्या विद्यार्थ्याचं नाव घेतो. मग तो विद्यार्थी त्याला बाहेर ओढण्याचा प्रयत्न करतो व वर्तुळातील सहकारी त्याला वाचविण्याचा प्रयत्न करतात. यासाठी १५- २० सेकंदाचा कालावधी दिला जातो. जर त्या वेळेत वर्तुळातील विद्यार्थ्याला बाहेर ओढण्यात यश मिळाले तर डाव देणाऱ्या गटास गुण मिळतात. वर्तुळातील विद्यार्थ्यास बाहेर ओढल्यामुळे वर्तुळातील विद्यार्थी संख्या एक -एकने कमी होत जाते. शेवटी एकही विद्यार्थी वर्तुळात शिल्लक राहणार नाही. जस जसे वर्तुळातील विद्यार्थी बाहेर ओढले जातात डाव देणाऱ्या विद्यार्थ्यासोबत एक -एक विद्यार्थी वाढत जातो. जसे प्रथम एक विद्यार्थी डाव देतो नंतर दोन विद्यार्थी पुढे तीन अशाप्रकारे डाव देणाऱ्याची ताकद वाढते व शेवटी पूर्ण विद्यार्थी डाव देतात व वर्तुळातील विद्यार्थी संख्या शून्य होते. परंतु दिलेल्या वेळेत डाव देणाऱ्यांनी आतील विद्यार्थ्याला बाहेर काढण्यात यश मिळविले नाही तर वर्तुळात असणाऱ्या गटास गुण मिळतात व बाद झालेले विद्यार्थी आत येतात. डाव देताना कविता / गीत/ बडबडगीत गायन करणे गरजेचे असे. जर असे झाले नाही तर वर्तुळातील बाद झालेले विद्यार्थी आत येतात व वर्तुळातील ताकद वाढवितात. प्रत्येक गटाला १०मिनिटे दिली जातात. जास्त गुण प्राप्त होणारा गट विजयी घोषित केला जातो. विजयी गट  **चतुरमेंढा** ठरतो. विजेत्या गटाला बक्षीस दिले जाते.

या उपक्रमामुळे-

१) विद्यार्थ्यांचा शारीरिक विकास होण्यास मदत झाली.

२) विद्यार्थ्यांमध्ये सहकार्य वृत्ती विकसित होण्यास मदत झाली.

३) विद्यार्थ्यांचे गीत पाठांतर होण्यास मदत झाली.

४) विद्यार्थी आनंदाने व कृतीयुक्त खेळाद्वारे शिक्षण घेतात.

५) विद्यार्थ्यांचा भाषिक विकास होण्यास मदत झाली.

**३) काडी पकडणे :-**

**काडी पकडणे** हा खेळ मैदानी आहे. यामध्ये विद्यार्थ्याच्या शारीरिक विकासासाठी हा खेळ महत्वपूर्ण ठरतो. हा खेळ दोन गटात खेळला जातो. या खेळात शब्द भेंडी आधारित डाव घेण्यात आला. यामध्ये पहिला गट शब्द सांगणार दुसरा गट शब्दाच्या शेवटच्या अक्षराधारित नवीन शब्द सांगणार, जो गट सांगू शकणार नाही त्या गटावर डाव येणार. जसे काम -- मन -- नयन -- नर ---

डाव देणाऱ्या गटातील एक विद्यार्थी दोन्ही हात वर करून हातात काडी फसवून उभा राहतो. दुसऱ्या गटातील विद्यार्थी काडी वर फेकतो. जास्तीत जास्त दूर काडी नेण्याचा प्रयत्न असतो. दुसऱ्या गटातील विद्यार्थी स्वत:ची काडी दगडावर ठेवून डाव देणाऱ्या विद्यार्थ्याची काडी त्याच्यापासून दूर-दूर करण्याच्या प्रयत्न करतात. डाव देणारा विद्यार्थी त्यांना पकडण्याचा प्रयत्न करतो. ज्या विद्यार्थ्याची काडी दगडावर नसेल तो विद्यार्थी पकडला गेल्यास बाद होतो . पुन्हा नवीन डाव शब्द भेंडी पासून ठरविला जातो. ज्या गटावर जास्त वेळा डाव आला तो हरतो. जिंकणाऱ्या गटास प्रोत्साहन बक्षीस दिले जाते.

या उपक्रमामुळे-

१) विद्यार्थ्यांना शारीरिक हालचालीतून शारीरिक विकास होण्यास मदत झाली.

२) शब्द संपत्ती व भाषिक विकासास सहाय्य झाले


३) विद्यार्थ्यांना खेळातून आनंद मिळाला.

४) विद्यार्थ्यांमध्ये सहकार्य वृत्ती विकास होण्यास मदत झाली.



**४) डब्बा :-**

**डब्बा खेळ** हा उपक्रम विशेषतः उपयोजित भाषा व शब्द संपत्ती विकासाकरिता राबविण्यात आला. हा खेळ एक- दोन किंवा तीन गटामध्ये एकाच वेळी खेळता येतो. अभ्यास व सराव करण्यासाठी सुद्धा हा खेळ घेता येतो. यामध्ये मैदानावर खाली दिलेल्या तक्त्याप्रमाणे डब्बे पाडून विद्यार्थ्यांना एक चौकोनी चीप फेकून त्यांध्ये लंगडी घालून, उडया मारून जावे लागते. डब्ब्यात समानार्थी, विरुधार्थी शब्द, लिंग बदल, वाक्प्रचार-म्हणी असे वेगवेगळे भाषिक खेळ घेण्यात आले.जो गट कौशल्य पूर्ण करेल तो गट किंवा खेडाळू जिंकतो. जिंकणाऱ्या खेडाळू किंवा गटाला बक्षीस देण्यात आले. मुळाक्षर करिता प्रत्येकी एक गुण, दोन अक्षरी शब्द करिता दोन गुण, तीन अक्षरी शब्द साठी तीन गुण अशाप्रकारे गुणांकन करण्यात आले. यासोबत समानार्थी, विरुधार्थी शब्द, लिंग बदल, वाक्प्रचार-म्हणी यासाठी गुणांकन निश्चित करण्यात आले.




डब्बा उपक्रमामुळे-

१) एका पायावर लंगडी खेळण्याच्या सरावामुळे लंगडी खेळाची पूर्वतयारी झाली.

२) विद्यार्थ्यांना आनंद मिळाला.

३) शब्द संपत्ती व भाषिक विकासास सहाय्य झाले.

**५) द्या टाळी :-**

**द्या टाळी** हा खेळ शब्द भेंडी, समानार्थी, विरुधार्थी शब्द, लिंग बदल, यमक जुळणारे शब्द अशा भाषिक विकासासठी घेण्यात आला. यामध्ये वर्तुळाकार उभे ठेवण्यात आले. एक विद्यार्थी दुसऱ्या विद्यार्थ्याच्या हातावर टाळी मारून खेळ खेळतात. टाळी मारताना शब्द बोलून टाळी द्यायची असते जर विद्यार्थी चुकला तर तो बाद होतो. जिथे शब्द नसतील तिथे दुसरा शब्द शिक्षक देतात. जलदता व अचूकता याद्वारे खेळ खेळणे आवश्यक असते.

जसे शब्द भेंडीत-- नर - रथ - थवा - वानर -----

समानार्थी शब्दात - आई - माता -- जननी ---

या उपक्रमामुळे-

१) विद्यार्थ्यांना आनंद मिळाला.

२) शब्द संपत्ती व भाषिक विकासास सहाय्य झाले.

**६) गोल रिंग :-**

शासनाकडून प्राप्त क्रीडा साहित्यामध्ये रिंग आहेत. ती रिंग तयार करून ती रिंग कमरेभोवती गोल-गोल फिरवणे हा उपक्रम घेण्यात आला. हा खेळ वैयक्तिक किंवा गटात घेण्यात आला. रिंग फिरविण्याच्या पाळीसाठी तोंडी शब्द भेंडी, समानार्थी, विरुधार्थी शब्द, लिंग बदल, यमक जुळणारे शब्द, वाक्प्रचार-म्हणी अशा भाषिक खेळाचा आधार घेण्यात आला. एका मिनिटात जास्तीत जास्त शब्द सांगणे, एकाच अक्षरावरून शब्द सांगणे, यमक जुळणारे शब्द, वाक्प्रचार-म्हणी अशा खेळाद्वारे संधी देण्यात आली. विद्यार्थी रिंग फिरवताना जितके रिंग फिरवतील तेवढे ते मोजण्यात आले. जो विद्यार्थी किंवा गट जास्त रिंग फिरवतील त्यांना विजयी घोषित करून बक्षीस देण्यात आले.

या उपक्रमामुळे-

१) विद्यार्थ्यांना आनंद मिळाला.

२) पाठांतर करण्यास उत्साह वाढला.

३) शब्द संपत्ती व भाषिक विकासास सहाय्य झाले.

४) कमरेच्या व्यायाम झाला.



**७) सागरगोटी :-**

सागरगोटी हा बैठे खेळ आहे. हा खेळ वैयक्तिक किंवा गटात घेण्यात आला. यामध्ये डाव घेण्यासाठी तोंडी शब्द भेंडी, समानार्थी, विरुधार्थी शब्द, लिंग बदल, यमक जुळणारे शब्द अशा भाषिक खेळाचा आधार घेण्यात आला. एका मिनिटात जास्तीत जास्त शब्द सांगणे, एकाच अक्षरावरून जास्तीत जास्त शब्द सांगणे, यमक जुळणारे शब्द, वाक्प्रचार-म्हणी अशा खेळाद्वारे डावाची संधी देण्यात आली. एक गोटी वर फेकणे व खाली असलेल्या गोट्यामधून एक-एक उचलून अलगत वरच्या वर झेल घेणे असा खेळ खेळतात. एकचा टप्पा पूर्ण झाला की एक गोटी वर फेकून दोन गोट्या उचलून अलगद वरच्या वर झेल घेणे असा खेळ खेळतात. अशा पद्धतीने तीनचा, चारचा व पुढील टप्पे पूर्ण करतात. यामध्ये झेल घेतला गेला नाही तर पुन्हा नवीन डाव सुरु करतात. त्यासाठी पुन्हा डाव घेण्यासाठी तोंडी शब्द भेंडी, समानार्थी, विरुधार्थी शब्द, लिंग बदल, यमक जुळणारे शब्द अशा भाषिक खेळाचा आधार घेण्यात आला.

या उपक्रमामुळे-

१) विद्यार्थ्यांना आनंद मिळाला.

२) पाठांतर करण्यास उत्साह वाढला.

३) शब्द संपत्ती व भाषिक विकासास सहाय्य झाले.

४) विद्यार्थ्यांची एकाग्रता वाढली.

**८) टिचकी मारा :-**

**टिचकी मारा** हा बैठे खेळ आहे. हा खेळ दोन गटांमध्ये घेण्यात आला. दोन गट एकमेकांसमोर बसतात. गट प्रमुख दुसऱ्या गटाच्या मागे उभा असतो. तो दुसऱ्या गटातल्या एका विद्यार्थ्यांचे डोळे बंद करतो. त्यानंतर तो एक गाणं / कविता म्हणतो. त्यावेळेस स्वत:च्या गटातील सहकाऱ्यास डोळे बंद केलेल्या विद्यार्थ्याच्या डोक्याला टिचकी मार असा इशारा करतो. त्या गटातील सहकारी येतो व टिचकी मारून आपल्या जागेवर बसतो. डोळे बंद केलेल्या विद्यार्थ्याने जर बरोबर ओळखले तर गटाला गुण मिळतात. जर ओळखले नाही तर पुन्हा डाव बसतो. पुन्हा तीच प्रक्रिया सुरु असते. विद्यार्थ्यांना कोणीही सांगू नये अशी सूचना दिली जाते.जर त्या सूचनेचे अनुपालन झाले नाही तर विरुद्ध गटाला गुण दिले जातात. योग्य विद्यार्थी ओळखल्यास दुसऱ्या गटाला संधी दिली जाते. जो गट जास्तीत जास्त ओळखेल व गुण प्राप्त करेल तो गट विजयी घोषित केले जाते. प्रत्येक डावात गीत/ कविता बदल करावा लागतो.

या खेळामुळे-

१) विद्यार्थ्यांना आनंद मिळाला.

२) गीत/ कविता पाठांतर करण्यास उत्साह वाढला.

३) विद्यार्थ्यांची श्रवण क्षमता वाढली.

४) विद्यार्थ्यांमध्ये सहकार्य वृत्ती विकास होण्यास मदत झाली.

५) आपल्याला कोणी टिचकी मारली ही ओळखण्याचा अंदाज वअचूक क्षमतेचा

विकास होतो.

**९) सापशिडी :-**

सापशिडी हा भारतीय बैठे खेळ आहे. या खेळामध्ये १०० चौरस असतात. त्या चौरसांना घर असेही संबोधतात. १ ते १०० क्रमाने चौरसात संख्या लिहिलेल्या असतात. एका फासावर १ ते ६ पर्यंत अंक असतात. फासा फेकून आलेल्या अंकानुसार तेवढी घरे पुढे चालावे लागते. फासावर ६ अंक आल्यास पुन्हा फासे खेळण्याची अतिरिक्त संधी मिळते. हा खेळ गटातील चार विद्यार्थ्यात घेण्यात आला. या खेळात ज्या घरात नाग किंवा साप आले त्यावेळी सापाच्या शेपटीच्या टोकाच्या घरी परत/ मागे यावे लागते. जर शिडीच्या घरात आल्यास शिडीद्वारे वर चढून पुढे जावे लागते. या बाबत सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. या खेळात विद्यार्थ्यांच्या संभाषण-वाचन क्षमता विकासनासाठी साप व शिडीच्या घरात अनुक्रमे आरोग्याच्या अयोग्य व योग्य सवयींच्या सूचना लिहिण्यात आल्या. यासोबत समानार्थी, विरुधार्थी, यमक जुळणारे शब्द, शब्द साखळी, वाक्प्रचार-म्हणी इत्यादी कृती सुद्धा देण्यात आल्या. साप व शिडीच्या घरात आल्यावर तिथे दिलेल्या

सूचना वाचून त्यानुसार कृती करण्यास सांगितले. जर विद्यार्थी अचूक वाचन न केल्यास, कृती न केल्यास परत सुरुवातीपासून डाव खेळावयास सांगितले. ज्या विद्यार्थ्याच्या सोंगाट्या सर्वात प्रथम १०० पर्यंत पोहोचताच तो प्रथम व ज्या स्पर्धकाच्या सर्वात शेवटी पोहोचताच तो विद्यार्थी हरतो. वर्ग व क्षमतेनुसार कृती देण्यात आल्या.

या खेळामुळे-

१) विद्यार्थ्यांना आनंद मिळाला.

२) आरोग्याच्या हितकारक व अहितकारक सवयी माहिती झाल्या.

३) विद्यार्थ्यांची वाचन क्षमता सुधारण्यास मदत झाली.

**१०) चौरस (लुडो) खेळ :-**

**चौरस (लुडो) खेळ** हा भारतातील प्रसिद्ध बैठे देशी खेळ आहे. सापशिडीप्रमाणे हा खेळ चार विद्यार्थ्यांमध्ये घेण्यात आला. या खेळातील घरात / चौरसावर सापशिडीप्रमाणेचं आरोग्याच्या अयोग्य व योग्य सवयींच्या सूचना अनुक्रमे लिहिण्यात आल्या. यासोबत समानार्थी, विरुधार्थी, यमक जुळणारे शब्द, वाक्प्रचार-म्हणी, शब्द साखळी इत्यादी कृती सुद्धा देण्यात आल्या. घरात आल्यावर तिथे दिलेल्या सूचना वाचून त्यानुसार कृती करण्यास सांगितले. जर विद्यार्थी अचूक वाचन न केल्यास, कृती न केल्यास परत जाऊन मागील स्थिर घरापासून सुरुवात करण्यास डाव खेळावयास सांगितले. ज्या विद्यार्थ्याच्या चारही सोंगाट्या सर्वात प्रथम पोहोचताच तो प्रथम व ज्या स्पर्धकाच्या सर्वात शेवटी पोहोचताच तो विद्यार्थी हरतो. वर्ग व क्षमतेनुसार कृती देण्यात आल्या.

या खेळामुळे-

१) विद्यार्थ्यांना आनंद मिळाला.

२) आरोग्याच्या हितकारक व अहितकारक सवयी माहिती झाल्या.

३) विद्यार्थ्यांची वाचन क्षमता सुधारण्यास मदत झाली.

**११) प्रश्नमंजुषा उपक्रम** :-

**प्रश्नमंजुषा उपक्रम** हा उपक्रम विशेषत: बौद्धिक क्षमता विकासासाठी आयोजित करण्यात आला. हा उपक्रम इयत्ता पहिली ते चौथीच्या सर्व विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आला. नवोपक्रमासाठी तयार केलेल्या मुख्य गटातील प्रत्येकी तीन-तीन विद्यार्थ्यांचे गट तयार करण्यात आले. उपगट तयार करताना प्रत्येक विद्यार्थ्यांच्या नावाच्या चिठ्ठी काढून सहभागी विद्यार्थी निवडण्यात आले. पुढील प्रश्नमंजुषेच्या वेळी मागील सहभागी विद्यार्थ्यांच्या नावाच्या चिठ्ठी वगळण्यात आले. यामुळे एकाच वर्गातील व एकाच विद्यार्थ्यांना वारंवार संधी टाळण्यात आली. प्रत्येक शनिवारला तीन

गटात हा उपक्रम घेण्यात आला. गटाची निवड सुद्धा चिठ्ठी काढून करण्यात आली. स्पर्धेत तीन फेरी घेण्यात आल्या.

**पहिली फेरी -** या फेरीत प्रत्येक गटाला दोन प्रश्न विचारण्यात आले. उत्तर देण्यासाठी १० सेकंदाचा अवधी देण्यात आला. अचूक उत्तरास १० गुण प्रदान करण्यात आले. चुकीच्या उत्तरास शून्य गुण देण्यात आले. गटाने चुकीचे उत्तर दिल्यास तो प्रश्न प्रेक्षकाना विचारण्यात आला.

**दुसरी फेरी -** या फेरीत प्रत्येक गटाला दोन प्रश्न विचारण्यात आले. प्रश्न विचारलेल्या गटास अचूक उत्तरास १० गुण प्रदान करण्यात आले. चुकीच्या उत्तरास शून्य गुण देण्यात आले. जर प्रश्नाचे उत्तर चुकले तर शेजारील एका गटास प्रश्न पास करण्यात आला. पास प्रश्नाच्या अचूक उत्तरास ५ गुण प्रदान करण्यात आले. चुकीच्या उत्तरास शून्य गुण देण्यात आले.

**तिसरी फेरी -** या फेरीत प्रत्येक गटाला एका मिनिटात जास्तीत जास्त प्रश्नाची उत्तरे देण्याची संधी देण्यात आली. प्रत्येक अचूक उत्तरासाठी १० गुण देण्यात आले. मात्र उत्तर चुकल्यास ५ गुण वजा करण्यात आले. गटाला प्रश्नाचे उत्तर येत नसल्यास तो प्रश्न पास करून पूढील प्रश्न विचारा असे म्हटल्यास गुण वजा करण्यात आले नाही.

प्रश्नमंजुषा फेरीतील प्रश्नात संबंधित आठवड्यात पूर्ण झालेला इयत्ता पहिली ते चौथीच्या अभ्यासक्रमाधारित सामान्य घटक, परीपाठातील सुविचार, प्रार्थना, सामान्य ज्ञान, पाठ-कविता व त्यांचे लेखक-कवी, स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवातील विविध उपक्रम, 'मेरी माटी, मेरा देश' उपक्रम, नवोपक्रमासाठी निवडलेल्या खेळाबाबत सामान्य माहिती, पद्धती, भाषिक कौशल्याधारित प्रश्न जसे समानार्थी, विरुधार्थी, यमक जुळणारे शब्द, वाक्प्रचार-म्हणी, गटात न बसणारा यासारख्या घटकावर प्रश्न विचारण्यात आले.

अशाप्रकारे तीनही फेरीतील गुणांची बेरीज करून सर्वात जास्त गुण मिळालेल्या गटास विजयी घोषित करण्यात आले. विजेत्या गटास पारितोषिक प्रदान करण्यात आले.

प्रश्नमंजुषा स्पर्धेमुळे

१) विद्यार्थी परिपाठात एकाग्रतेने लक्ष देऊ लागले.

२) विद्यार्थ्यांना प्रश्नमंजुषा स्पर्धेचा अनुभव मिळाला.

३) अवधानपूर्ण श्रवण करण्याच्या क्षमतेत वाढ झाली.

४) तोंडी उत्तरे (संभाषण क्षमतेत) देण्याचा आत्मविश्वास वाढला.

५) विद्यार्थ्यांमध्ये समन्वय, चर्चा करणे व सहकार्य वृत्ती विकास होण्यास मदत झाली.

वरील उपक्रमाव्यतिरिक्त खालील खेळ व उपक्रम सुद्धा आयोजित करण्यात आले.

११) चंगा- अष्टा

१२) उडया मारा

१३) दोरी उडया मारा

१४) धावणे

१५) बाजार

१६) लगोरी

१७) कबड्डी

१८) लंगडी

१९) लेझीम

२०) डंबेल्स

सदर नवोपक्रम इथेच थांबलेला नसून अनेक खेळ व उपक्रम सातत्याने आयोजित करणे सुरु राहणार आहे.

## • नवोपक्रमाची यशस्विता :-

**सुप्रसिद्ध शिक्षण तज्ञ जे.पी. नाईक म्हणतात, "शाळा हे उपक्रमांचे मोहोळ असावे."** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, धरमवाडीतील इयत्ता पहिली ते चौथीपर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांसाठी सदर नाविण्यपूर्ण उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यामुळे संपूर्ण शाळाच या उपक्रमात सहभागी झाली. त्यामुळे प्रत्येक उपक्रमात प्रत्येक विद्यार्थी सहभागी होईल याबाबत कटाक्षाने लक्ष देण्यात आले.

'भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवानिमित्त आयोजित उपक्रमात' प्रत्येक विद्यार्थी सहभागी झाला. शाळेत नाविण्यपूर्ण उपक्रमामुळे शाळेतील वातावरणात चैतन्य निर्माण झाले. विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळाली व उत्साह निर्माण झाला. विद्यार्थी परिपाठात लक्ष देऊ लागले. विद्यार्थी परिपाठात आनंदाने सहभागी होऊ लागले. या नाविण्यपूर्ण उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना देशी खेळाची विशेष माहिती मिळाली. विविध खेळांतील सहभागामुळे विद्यार्थ्यांचा शारीरिक विकासास हातभार लागला. सदर नाविन्यपूर्ण उपक्रमामुळे विविध भाषिक खेळाची माहिती मिळाली. विविध भाषिक खेळांतील सहभागामुळे विद्यार्थ्यांच्या भाषिक विकासास सहाय्य झाले. प्रश्नमंजुषा सारख्या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासास मदत झाली. या नाविण्यपूर्ण उपक्रमात विद्यार्थ्यांना गटात काम करण्याची संधी मिळाली. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये सहकार्य करण्याची वृत्ती वाढली.

विद्यार्थ्यांना खेळातून कृतीयुक्त शिक्षण मिळाले. विद्यार्थी आनंदाने ज्ञानग्रहण करू लागले. प्रत्येक विद्यार्थी आनंदाने व उत्साहाने या उपक्रमामध्ये सहभागी झाल्यामुळे सर्वांगीण विकासाकडे व गुणवत्तापूर्ण शिक्षणाकडे वाटचाल होत असल्याचे चित्र निर्माण झाल्याचे दिसून येते. हीच या उपक्रमाची फलश्रुती ठरते.

## • समारोप :-

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आपल्या 'ग्रामगीते'च्या एकोणिसाव्या अध्यायात म्हणतात,

**"आदर्श होतील विद्यार्थीगण | गावाचे पालटेल जीवन |**

**कोठेच न उरेल गावंढळपण | टिकाऊ परिवर्तन या मार्गे ||१०९||**

शाळा हे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे मुख्य केंद्र आहे. औपचारिक शिक्षणातून विद्यार्थ्यांचे शारीरिक, बौद्धिक, भावनिक व सर्वांगीण विकासाचे एकमेव साधन म्हणजे शाळा ! यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येतात. प्राथमिक शिक्षण हा पाया समजला जातो. हा पाया मजबूत होणे गरजेचे असते. यासाठी विविध उपक्रम आयोजित करणे अनिवार्य असते. या दृष्टीकोणातून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, धरमवाडी येथील इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांच्या शारीरिक विकासासोबत भाषिक, बौद्धिक, भावनिक व मानसिक विकास या दृष्टिकोनातून विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. सदर उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या शारीरिक विकासासोबत भाषिक व बौद्धिक विकास सुद्धा झाल्याचे या उपक्रमातून दिसून आले. विद्यार्थी गटात कार्य केल्यामुळे एकमेकांशी चर्चा करणे, समन्वय साधणे, सहकार्याची वृत्ती या गुणाचा विकास सहज होतो. एकमेकांसोबत शिकत असल्यामुळे ज्ञानाचे दृढीकरण होते. कृतियुक्त शिक्षण मिळते. आनंद प्राप्त होतो व विद्यार्थ्यांध्ये उत्साह वृद्धिंगत झाल्याचे दिसून आले. 'सुदृढ शरीरात निकोप मन वास करते' या उक्तीनुसार शारीरिक विकास होताना भाषिक व बौद्धिक विकाससोबत संयम, धैर्य, नेतृत्व करणे या सोबतच सहकार्य, समन्वय यासारख्या सामाजिक गुणांचा व भावनिक गुणांचा विकास सुद्धा या उपक्रमातून झाल्याचे दिसून आले.

तात्पर्य विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टिकोनातून सदर नवोपक्रम अतिशय उपयुक्त व सार्थ ठरल्याचे दिसून येते.

## • संदर्भसूची


| अ.क्र. | पुस्तकाचे नाव | लेखक | प्रकाशक | वर्ष |
|---|---|---|---|---|
| १ | ग्रामगीता | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज | महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे | २००३ |
| २ | उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण व शिक्षक | डॉ.हिरा अहेर | विद्या प्रकाशन, नागपूर | १९९५ |
| ३ | शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे | रा.श.मुळे, वि.तु.उमाठे | महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, नागपूर | १९८७ |
| ४ | कृती संशोधन व नवोपक्रम | डॉ.व.झा. साळी, डॉ.सुरेश करंदीकर | फडके प्रकाशन, कोल्हापूर | २००७ |
| ५ | कृती संशोधन व नवोपक्रम | अरविंद कपोले | निराली प्रकाशन,पुणे | २००६ |

# • परिशिष्ट १

## नवोपक्रमासाठी तयार केलेले विद्यार्थ्यांचे गटनिहाय संख्या-

| गट क्रमांक | गटाचे नाव | गट प्रमुख | समाविष्ट विद्यार्थी संख्या | | | | एकूण विद्यार्थी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | इयत्ता पहिली | इयत्ता दुसरी | इयत्ता तिसरी | इयत्ता चौथी | |
| १ | सावित्रीमाई फुले | कु.संस्कृती सूर्यवंशी | ३ | ४ | २ | २ | ११ |
| २ | महात्मा फुले | रणवीर कांबळे | ३ | ४ | २ | २ | ११ |
| ३ | डॉ.बाबासाहेब आंबेडकर | उत्कर्ष दुधे | ३ | ४ | २ | २ | ११ |
| ४ | छत्रपती शिवाजी महाराज | अभय लांडगे | ३ | ३ | १ | ४ | ११ |
| ५ | महात्मा गांधी | प्रज्वल पंडित | ३ | ३ | १ | ४ | ११ |
| ६ | राजमाता जिजाऊ | कु.लावण्या वानखेडे | ३ | ३ | १ | ५ | १२ |
| एकूण | | | १८ | २१ | ९ | १९ | ६७ |

# • परिशिष्ट २

## गट निहाय विद्यार्थी यादी

### १) सावित्रीमाई फुले गट

| अ.क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | इयत्ता |
|---|---|---|
| १ | कु.संस्कृती विनोद सूर्यवंशी | गट प्रमुख इयत्ता ३ |
| २ | कु.गुंजन अमोल कानंदे | १ |
| ३ | कु. प्रज्ञा गजानन जोग्दंडे | १ |
| ४ | आदर्श शरद वानखेडे | १ |
| ५ | कु.जयश्री गजानन पळसकर | २ |
| ६ | कु.गुंजन लक्ष्मण आडे | २ |
| ७ | अवि प्रवीण वाघमारे | २ |
| ८ | अर्जुन विनोद खडसे | २ |
| ९ | अनिकेत अमोल कांबळे | ३ |
| १० | कु.स्नेहल संदीप सावळे | ४ |
| ११ | सार्थक गजानन कांबळे | ४ |

## २) महात्मा फुले गट

| अ.क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | इयत्ता |
|---|---|---|
| १ | रणवीर दिनेश कांबळे | गट प्रमुख इयत्ता ४ |
| २ | कु.अंजली प्रकाश ढाले | १ |
| ३ | श्याम गजानन पळसकर | १ |
| ४ | निखील भोला आडे | १ |
| ५ | कु.मयुरी ठाकूर सकारापुरे | २ |
| ६ | कु.शुभ्रा श्रीकांत कोठेकर | २ |
| ७ | आयुष सुधीर कांबळे | २ |
| ८ | जय विनायक सावळकर | २ |
| ९ | कु.परि बंडू पाटील | ३ |
| १० | कुणाल विठ्ठल ताडे | ३ |
| ११ | वैभव रवींद्र कांबळे | ४ |

### ३) डॉ.बाबासाहेब आंबेडकर गट

| अ.क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | इयत्ता |
|---|---|---|
| १ | उत्कर्ष देवराव दुधे | गट प्रमुख इयत्ता ४ |
| २ | कु.सुहानी आकाश कांबळे | १ |
| ३ | कु.समृद्धी शिवाजी वारंगे | १ |
| ४ | आरुष अमोल ताडेवाड | १ |
| ५ | कु.प्रगती विशाल कांबळे | २ |
| ६ | कु.वैष्णवी हेमराज शिंदे | २ |
| ७ | विनीत निलेश खरतडे | २ |
| ८ | आयुष किरण पाटील | २ |
| ९ | कु.साक्षी राम टेकाम | ३ |
| १० | दुर्गेश गणपत नंदनकर | ३ |
| ११ | ऋषिकेश धनराज बरडे | ४ |

## ४) छत्रपती शिवाजी महाराज गट

| अ.क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | इयत्ता |
|---|---|---|
| १ | अभय गजानन लांडगे | गट प्रमुख इयत्ता ३ |
| २ | कु.गौरी संदीप सावळे | १ |
| ३ | कु.प्राची जयराज सोनेराव | १ |
| ४ | आयुष उदय वानखेडे | १ |
| ५ | कु.लक्ष्मी  वीरसिंग ठाकूर | २ |
| ६ | ओंकार गजानन मेश्राम | २ |
| ७ | संकेत देवानंद लांडगे | २ |
| ८ | निशांत पांडुरंग ताडे | ४ |
| ९ | आर्यन मारोती नंदनकार | ४ |
| १० | कु शिवानी साईनाथ बाभटकर | ४ |
| ११ | रोषण गंगाराम आडे | ४ |

## ५) महात्मा गांधी गट

| अ.क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | इयत्ता |
|---|---|---|
| १ | प्रज्वल गौतम पंडित | गट प्रमुख इयत्ता ४ |
| २ | कु.वनमाला गजानन देवतळे | १ |
| ३ | वंश गुरुदास चव्हाण | १ |
| ४ | भव्य गजानन पुरी | १ |
| ५ | कु.आरुषी देवराव दुधे | २ |
| ६ | कु. नंदिनी दिनेश कांबळे | २ |
| ७ | यशवंत अमोल गवळे | २ |
| ८ | आदित्य अरुण कांबळे | ३ |
| ९ | कु. विश्रांती विष्णू कांबळे | ४ |
| १० | रुद्र रणधीर कांबळे | ४ |
| ११ | उत्कर्ष देविदास ताळमवाड | ४ |

## ६) राजमाता जिजाऊ गट

| अ.क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | इयत्ता |
|---|---|---|
| १ | कु.लावण्या वानखेडे | गट प्रमुख इयत्ता ४ |
| २ | कु.रिया संतोष हिवराळे | १ |
| ३ | प्रिन्स आकाश मुजमुले | १ |
| ४ | रुद्र कोंडाबा खडसे | १ |
| ५ | कु.राखी खंडूजी वाकोडे | २ |
| ६ | मंगेश साईनाथ बाभटकर | २ |
| ७ | अर्णव सुधाकर बरडे | २ |
| ८ | राघव राजू वर्मा | ३ |
| ९ | कु.राखी कोंडबा खडसे | ४ |
| १० | कु.रुपाली विष्णू राठोड | ४ |
| ११ | करण विजय राठोड | ४ |
| १२ | शुभम प्रवीण बरडे | ४ |

## • परिशिष्ट ३





हक्क आणि कर्तव्य ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.
failure is the first step of success.
राज्यगीत
Shot on OnePlus